Annex-V

प्रकल्प प्रवर्तक मे. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, राजारामनगर, पोस्ट- साखराळे, तालुका- वाळवा, जिल्हा- सांगली, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात मळीवर आधारित प्रस्तावित आसवणी विस्तारिकरण क्षमता ७५.० किलो लिटर प्रतिदिन पासून १५०.० किलो लिटर प्रतिदिन पर्यत करणेबाबतच्या प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा इतिवृतांत

---

प्रकल्प प्रवर्तक मे. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, राजारामनगर, पोस्ट- साखराळे, तालुका- वाळवा, जिल्हा-सांगली, महाराष्ट्रयांच्या कार्यरत प्रकल्पात मळीवर आधारित प्रस्तावित आसवणी विस्तारिकरण क्षमता ७५.० किलो लिटर प्रतिदिन पासून १५०.० किलो लिटर प्रतिदिन पर्यत करणेबाबत प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी दिनांक, ०८ जुलै, २०२१ रोजीदुपारी १२.३० वाजता प्रकल्प स्थळावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई. ५० व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०७०१-FTS-०१४९, दिनांक ०१-०७-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठन करण्यात आली.

१) डॉ. अभिजीत चौधरी, (भाप्रसे) - अध्यक्ष
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
सांगली.

२) श्री रविंद्र आंधळे, - सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

३) श्री नवनाथ अवताडे - आयोजक
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सांगली.

बैठकीच्या सुरवातीस प्रकल्पाचे अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प विस्तारिकरणाबाबत माहिती देऊन सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असल्याचे सांगितले.

श्री. नवनाथ अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सांगली तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी डॉ. अभिजीत चौधरी, भाप्रसे,

जिल्हा दंडाधिकारी, सांगली तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती, श्री रविंद्र आंधळे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीसमिती, सर्व शासकीय अधिकारी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, पत्रकार, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारिरीक तापमान बैठकीच्या प्रवेशव्दारा जवळ तपासले जात असून बैठकीच्या जागी सॅनिटायझरचा वापर, प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीसमिती यांनी समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक, यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री. नवनाथ अवताडे यांनी असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, राजारामनगर, पोस्ट- साखराळे, तालुका- वाळवा, जिल्हा-सांगली, महाराष्ट्रयांच्या कार्यरत प्रकल्पात मळीवर आधारित प्रस्तावित आसवणी विस्तारिकरण क्षमता ७५.० किलो लिटर प्रतिदिन पासून १५०.० किलो लिटर प्रतिदिन पर्यत प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा प्रस्ताव मप्रनि मंडळास प्राप्त झाला होता. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्गअ ५ (जी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक, यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे

होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावनाजाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करुन त्यानुसार प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन सादर केलेला आहे.

पर्यावरण, वने व हवामान बदलमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०२० च्या कार्यालयीन टिप्पणीनुसार कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार उपस्थितांनी बैठकीत मुखपट्टी, दोन व्यक्तींमध्ये अंतर पाळण, सॅनिटायझरचा वापर बंधनकारक करण्यात आलेला आहे.

सदर पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीची सूचना देणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सांगली यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र "सकाळ" मध्ये मराठी व राष्ट्रीय वृत्तपत्र "दि टाइम्स ऑफ इंडिया" मध्ये इंग्रजी भाषेमध्ये दिनांक ०८-०६-२०२१ रोजी जाहिर सुनावणीची सूचना प्रसिद्ध करण्यात आलेली होती त्यामध्ये प्रकल्पाने बाधित होणारे स्थानिक नागरिक, पर्यावरण विषयक कार्यरत संस्था, यांना प्रस्तावित प्रकल्पा विषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी वा सुनावणी वेळी तोंडी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज- पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर-४४० ००१,मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-सांगली, मुख्य कार्यकारी अधिकारी -जिल्हा परिषद, सांगली, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सांगली, तहसिल कार्यालय-वाळवा, जिल्हा-सांगली, मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय-साखराळे, बोरगांव, हुबालवाडी, कापुसखेड, फारणेवाडी, बहे, तालुका-

वाळवा, जिल्हा-सांगली, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - कोल्हापूर, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली, पर्यावरण व वातावरण बदल विभाग, मंत्रालय, मुंबई आणि महारा।ष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सामान्य जनतेसाठी माहितीकरिता उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उपप्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सांगली यांना एकही सूचना/तक्रार नोंदविण्यात आलेली नाही.

श्री नवनाथ अवताडे, आयोजक, यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाच्या संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापनाच्या योजने बाबत सादरीकरण करण्याबाबत विनंती केली. त्यानुसार तांत्रिक सल्लागार यांनी सविस्तर सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पास ११,५८९.०९ लाख रुपयांचा खर्च येणार असून केंद्र शासनाच्या निर्देशांनुसार आसवणी प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज (ZLD) असेल. विस्तारिकरणामुळे प्रकल्पात ५० व्यक्तींना रोजगाराची संधी मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रकल्प सल्लागार यांनी विविध प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती दिली.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सविस्तर सादरीकरण केलेले असुन पर्यावरणाच्या दृष्टीने सर्व मुद्दे स्पष्टपणे सादर केलेले आहेत, उपाययोजनाही सांगितलेल्या आहेत. तरी परिसरातील नागरिक जे उपस्थित आहेत, त्यांनी सदरहू प्रकल्पाबाबतच पर्यावरणाचे काही आक्षेप, सूचना, टिका टिप्पणी असल्यास त्या उपस्थित कराव्यात अशी विनंती केली.

<u>खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-</u>

१) श्री विनोद राजाराम बाबर, राहणार- पोस्ट-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगलीः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती कमी होईल का वाढेल? | प्रकल्पाचे महाव्यवस्थापक यांनी उत्तर दिले की या प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती वाढणार आहे. सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे विस्तारीकरणामुळे ५० व्यक्तींना रोजगाराची संधी मिळू शकते. |

२) श्री अविनाश अधिकराव पाटील, राहणार- पोस्ट-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगलीः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पामुळे स्थानिक लोकांना काय फायदा होईल? | प्रकल्पाच्या महाव्यवस्थापक यांनी उत्तर दिले की स्थानिकांना विस्तारिकरणाचा भरपूर फायदा होईल. इथेनॉल विक्रीमुळे होणा-या फायद्यातून स्थानिक व परिसरातील शेतक-यांना त्यांच्या ऊसासाठी जादा दर देता येईल. त्याचप्रमाणे इथेनॉल विक्रीसाठी अतिरिक्त टँकर्स लागतील. ते स्थानिकांकडून घेण्यात येतील. त्यामुळे स्थानिक वाहतुकदारांच्या व्यवसायातही वाढ होईल. हे फायदे या प्रकल्पामुळे मिळतील. |

३) श्री सद्‌गुरु बाळासाहेब चौगुले, राहणार- पोस्ट-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगलीः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | सदरहू विस्तारीकरण प्रकल्पामुळे हवेचे प्रदूषण किती होईल व त्याचा परिणाम परिसरातील लोकांवर कसा होईल? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सादरीकरणात दाखविल्याप्रमाणे प्रकल्पात दोन प्रकारचे बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार आहेत. सदरहू प्रकल्पात हवा प्रदूषणाचा मुख्य स्त्रोत हा इन्सिनरेशन बॉयलर हा आहे. ह्यातून बाहरे पडणारे धुलीकण अटकाव करण्यासाठी इलेक्ट्रो-स्टॅटिक प्रिसिपिटेटर (ईएसपी) ही अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याची ९९% कार्यक्षमता असते. त्यामुळे प्रदूषण कमी होईल.<br>त्याचप्रमाणे ज्यावेळी ऊसाचा रस वापरण्यात येईल, त्यावेळी प्रकल्पात जाळण्यासाठी कोळसा वापरण्यात येणार नाही. तर कारखान्यात तयार होणारा बगॅस वापरणार आहोत. त्याचप्रमाणे हवा प्रदूषण नियंत्रणासाठी वेट स्क्रबर ही हवा प्रदूषण सयंत्रणा वापरणार आहोत. त्याचीही कार्यक्षमता ही ९७% पेक्षा जास्त असणार आहे. त्यामुळे परिसरात हवा प्रदूषणाचा धोका खूपच कमी आहे. |

४) श्री राजेन्द्र जयसिंगराव पाटील, राहणार- पोस्ट-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगलीः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | प्रकल्पात उत्पन्न होणा-या दुषित पाण्याची विल्हेवाट कशा प्रकारे करण्यात येईल? | सदरहू तिस्तारिकरण प्रकल्पात दोन प्रकारचे सांडपाणी उत्पन्न होईल. एक स्पेंट वॉश. ज्यावेळी इथेनॉल निर्मितीनंतर स्पेंटवॉश उत्पन्न होईल, त्या स्पेंट वॉशचे आपण बाष्प तयार करणार आहोत. बाष्पीकरणात उत्पन्न होणा-या पाण्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे. उरलेल्या स्पेंट वॉशची ६०% घनता वाढवून स्पेंट वॉश हा इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येईल.<br>ज्यावेळी ऊसाचा रस वापरण्यात येईल, त्यावेळी जो काही स्पेंट वॉश तयार होईल, त्याचे बाष्पीभवन करुन त्यातील पाणी काढून त्याची पावडर तयार करण्यात येणार आहे. ती पावडर तयार करण्याअगोदर तेथे बायोगॅस यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. तेथील अक्षय उर्जा (Renewable Energy) निर्मितीमुळे कारखान्यातील बगॅसची बचत होईल. पावडर स्पेंट वॉशमध्ये पोटॅशचे प्रमाण खूप जारत असते. बरेचशे खत निर्मिती कारखाने ते कच्चा माल म्हणून विकत घेतात. त्यांना देण्यात येईल. |

५) श्री सचिन रामचंद्र पाटील, राहणार-इस्लामपूर, तालुका-वाळवा, जिल्हा- सांगलीः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पास किती खर्च येणार आहे व त्याची तरतुद कशी करण्यात आलेली आहे? | प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी उत्तर दिले की एकूण प्रकल्पाचा मूळ खर्च आहे ११८ कोटी ८६ लाख रुपये आहे. जीएसटी १८ कोटी ८५ लाख. प्रकल्पाचा एकूण खर्च १३७ कोटी ७१ लाख एवढा आहे. ९०% अर्थसहाय्य हे वित्तीय संस्थांकडून व १०% स्वनिर्मितीतून करणार आहेत. ६५ कोटी जिल्हा मध्यवर्ती बँक, सांगली यांच्याकडून मंजूर झालेले आहेत. उर्वरित रक्कमेसाठी स्टेट बँकेकडे प्रकरण सादर करण्यात आलेले आहे. लवकरात लवकर त्यांच्याकडून मंजूरी मिळेल. १०% स्वनिर्मितीतून खर्च करणात आहेत, ते पैसे उपलब्ध आहेत. |

६) श्री सर्जेराव नारायण देशमुख, राहणार-फार्णेवाडी बोरगांव, तालुका वाळवा, जिल्हा-सांगली,

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | सदरहू प्रकल्पाच्या क्षमतावाढी अगोदर जनसुनावणी घेतली, त्याबद्दल जिल्हाधिकारी, सांगली, प्रदूषण नियंत्रण मंडळ व अध्यक्ष राजारामबापू सहकारी साखर कारखाना यांचे अभिनंदन. सध्याच्या स्थितीत ऊसाचे दर पाहता शेती परवडत नाही. त्यामुळे या प्रकल्पामुळे जर शेतक-यांना जादा पैसे मिळाले, तर योग्य. हा कारखाना गेले ५० वर्षे सभासद, शेतकरी यांच्या हिताचे काम करत आहे. तरी या प्रकल्पाच्या वाढीबरोबरच कार्यक्षेत्रातील शेतक-यांच्या मुलांना रोजगार मिळावा हाही मुद्दा महत्वाचा आहे, ही सूचना करत आहे तरी हा प्रकल्प त्वरित सुरु व्हावा ही विनंती. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

७) श्री बाबुराव निवृत्ती पाटील, राहणार- पोस्ट-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | शेती हा प्रमुख व्यवसाय ह्या परिसरातील आहे. ऊस व त्यावर कारखानदारीची याठिकाणी निर्मिती झाली. त्यामुळे राहणीमान व आर्थिक दर्जा उंचावलेला आहे. आमची मागणी संचालकांकडे असते की आमच्या ऊसाला उत्पादनावर आधारित दर मिळाला पाहिजे. पण आताची कारखान्याची परिस्थिती पाहता नुसत्या साखर उत्पादनापासून दर देणे शक्य होत नाही. तरी आसवणी प्रकल्पाची क्षमता वाढविण्याचा निर्णय हा योग्य आहे. सदरहू प्रकल्पा हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून त्यामुळे प्रदूषण होणार नाही. स्पेंट वॉश हा कारखान्यातच जाळला जाणार आहे. ती आम्ही शेतकरील या प्रकल्पास मान्यता देतो. | सूचनेची नोंद घेण्यात आली |

८) श्री प्रदीप तानाजीराव चव्हाण, राहणार- नवे खेड,पोस्ट-, तालुका - वाळवा, जिल्हा-सांगली:-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | जनसुनावणीत वसंतदादा संस्थेने जे सादरीकरण केले, त्यावरुन असे दिसून येते की सदरहू प्रकल्प हा शेतक-यांच्या हिताचा आहे. विस्तारिकरणामुळे ५० लोकांना रोजगाराची संधि मिळणार आहे. त्याचप्रमाणे इथेनॉल निर्मितीमुळे व केंद्र सरकारच्या २०% पेट्रोलमध्ये वापरामुळे मिळणा-या पैशातून शेतक-यांच्या ऊसाला जादा भाव मिळणे शक्य आहे. सदरहू कारखान्याने गेले ५० वर्षे लोकहित कामे वेळोवेळी हाती घेतली आहेत. वाळवा तालुक्याच्या विकासात सिंहाचा वाटा कारखान्याचा आहे. या प्रकल्पास आमची कोणाचीही हरकत नाही असे मी सूचित करतो. | सूचनेची नोंद घेण्यात आली |

९) **श्री रविंद्र आंधळे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | आपण प्रकल्पात एम.ई.ई.स्थापित केलेला आहे व स्प्रे ड्रायरही कार्यान्वित आहे. दोघांचा उद्देश एकच आहे. तर ह्या दोन दोन गोष्टी लावण्याचे कारणकाय? | प्रकल्पात तीन प्रकारचा कच्चा माल वापरणार आहोत. सी-एच मोलॅसिस, बी-एच मोलॅसिस आणि उसाचा रस. ज्यावेळी सी-एच आणि बी-एच मोलॅसिस वापरतो, त्यापासून तयार होणारा स्पेंट वॉशमध्ये जे घनपदार्थ/ solids असतात, ते जवळजवळ १०-१२% जास्त असतात. त्यामुळे बाष्पीभवनानंतर आपण ते इन्सिनरेशनला पाठविणार आहोत.<br>तर उसाच्या रसापासून जो स्पेंट वॉश तयार होतो, तो ३ लीटर प्रती इथेनॉलपर्यंत तो असेल, त्यात सॉलिडसचे प्रमाण हे ५-६% असते. ते ६०% करेपर्यंत जी उर्जा लागते, तर कारखान्यात बायोमिथिनाझेशन प्लँट आहे. त्यामुळे कारखान्यातील कार्यरत पायाभूत सुविधांचा वापर करणे, स्पेंट वॉशच्या पावडरमधील पोटॅश खताच्या निर्मितीसाठी वापरला जाईल. |

१०) **श्री नवनाथ अवताडे, आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | आताच सदस्य, जनसुनावणी समिती यांनी विचारले की त्याप्रमाणे इन्सिनरेशन बॉयलर आणि ड्रायर यात कोणते शेवटी कार्यान्वित करण्यात येईल? आपण बी आणि सी ला स्वतंत्र ईव्हॅपरेशन युनिट दिलेले आहे. उसाचा रस वापरताना आपण ईव्हॅपरेशन फॉलोड बाय ड्रायर दिलेला आहे. हे सगळे युनिट येतील काय किंवा त्यात तुमचा काय दुसरा विचार आहे काय? | ज्यावेळी बी आणि सी रुट वापरु, त्यावेळी रुट हा इन्सिनरेशनला जाईल.<br>ज्यावेळी ऊसाचा रस वापरु, त्यावेळी इव्हॅपोरेशन नंतर बायो गॅस व त्यानंतर इव्हॅपोरेशन व त्यानंतर त्याची पावडर करण्यात येईल. जसा कच्चा माल वापरु, त्याप्रमाणे झेडएलडी साठी आपण दोन रुट वापरणार आहोत. मात्र दोन्ही प्रक्रियांचा मुख्य उद्देश आहे झिरो लिक्विड डिस्चार्ज. कुठल्याही प्रकारचे पाणी या प्रकल्पातून बाहेर जाणार नाही. |

पर्यावरण जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहने केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरण जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष, पर्यावरण जाहिर जनसुनावणी समिती यांना मनोगत व्यक्त करण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरण जाहिर जनसुनावणी समिती यांनी मनोगत व बैठकीचा समारोप करताना सांगितले की आजची ही बैठक राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड

यांच्या प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी क्षमता विस्तार ७५.० कि.लि.प्रतिदिन पासून १५०.० कि.लि.प्रतिदिन पर्यंत प्रकल्पाबाबतची जाहिर जनसुनावणी घेण्याबद्दल आहे. सदरहू प्रकल्पासाठी पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेणे व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील मार्गदर्शक तत्वांनुसार आगाऊ जनसुनावणी घेणे बंधनकारक असल्याने ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. प्रकल्पाच्या तांत्रिक व पर्यावरण सल्लागार यांनी संपूर्णपणे तांत्रिक सादरीकरण येथे सादर केलेले आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रदूषण होऊ नये म्हणून भविष्यातील उपाययोजनांचे त्यांना संपूर्णपणे स्पष्टीकरण दिलेले आहे. जनसुनावणीस उपस्थितांनी त्यांच्या शंका, सूचना येथे उपस्थित केलेल्या आहेत. प्रकल्पाची माहिती जनतेस देणे, त्यातील तांत्रीक व पर्यावरणीय मुद्दे हे जनतेस सांगणे व जनतेस या प्रकल्पामुळे होणारा फायदा अवगत करणे हा जनसुनावणीचा उद्देश असतो.तो येथे साध्य झालेला आहे. जनसुनावणीत माझ्याकडून काही सूचना, आक्षेप नोंदविणे हे अपेक्षित नाही. आपण उपस्थित केलेल्या शंका, सूचना, आक्षेप नोंदविणे हा आहे. बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात येईल व ते म.प्र.नि.मंडळातर्फे शासनास पाठविण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की अतिशय योग्य प्रकारे व खेळीमेळीच्या वातावरणात ही जनसुनावणी पूर्ण झालेली आहे. त्या नियोजनाबद्दल त्यांनी कारखाना व्यवस्थापन, म.प्र.नि. मंडळ कार्यालय यांचे अभिनंदन केले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

आयोजक यांनी समितीचे अध्यक्ष, सदस्य व उपस्थित नागरिकांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली. बैठकीत माननीय अध्यक्षांना साखराळे, बहे आणि हुगालवाडी ग्रामपंचायतीतर्फे लेखी निवेदन देण्यात आली. सुनावणीची कार्यवाही १२.३० वाजता सुरु होऊन दु. २.१५ वाजता समाप्त झाली.

| | |
|---|---|
| (नवनाथ अवताडे) | (रविंद्र आंधळे) |
| आयोजक, | सदस्य, |
| पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी | पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी |
| समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, | समिती तथा प्रादेशिक अधिकारी, |
| म.प्र.नि. मंडळ, सांगली, | म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर |

(डॉ. अभिजीत चौधरी, भाप्रसे)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा जिल्हादंडाधिकारी सांगली,
जिल्हा सांगली